अशासकीय खाजगी शाळांतील अर्धवेळ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी १ जानेवारी २०१६ पासून सुधारित वेतन संरचना मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः वेतन-१२१९/प्र.क्र.१९/१९ /टिएनटी-३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक:- ०६ ऑगस्ट , २०१९

वाचा :-

१. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.वेतन-१२१४/(२७)/टिएनटी-३, दिनांक १६ जुन, २०१४
२. शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेपुर-२०१८/प्र.क्र.४४/सेवा-९, दि. ०१ जानेवारी, २०१९
३. शासन अधिसूचना वित्त विभाग क्र.वेपुर २०१९/प्र.क्र.१/सेवा-९ दि. ३० जानेवारी, २०१९
४. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.वेपुर २०१९/ प्र.क्र.८/सेवा-९, दि. २० फेब्रुवारी, २०१९
५. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.वेतन-१२१९/ प्र.क्र.१९/टिएनटी-३, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९
६. शासन परिपत्रक वित्त विभाग वेपुर -२०१९/ प्र.क्र. १५ / सेवा ९ दिं. १४ मे, २०१९

प्रस्तावना :-

अशासकीय खाजगी शाळांतील पूर्णवेळ कर्मचाऱ्यांना दि. २२ फेब्रुवारी २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून सुधारित वेतन संरचना मंजूर करण्यात आली आहे. पूर्णवेळ कर्मचाऱ्यांची समकक्ष अर्हता धारण करीत असणाऱ्या व पूर्णवेळ कर्मचाऱ्यांच्या किमान निम्मा एवढा कार्यभार असणाऱ्या माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक स्तरावरील व अध्यापक विद्यालयातील सर्व प्रकारच्या अर्धवेळ कर्मचाऱ्यांना दि. १ जानेवारी २०१६ पासून सुधारित वेतन संरचना मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यावर शासनाने आता खालील निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:-

सुधारित वेतन संरचना ही वेतन मॅट्रीक्स वर आधारित असेल. वर नमुद कर्मचाऱ्यांसाठी वेतन हे सर्वसाधारण वेतन मॅट्रीक्सच्या किमान व कमाल वेतनाच्या रक्कमेच्या निम्मे सोबतच्या परिशिष्टामध्ये नमुद केल्याप्रमाणे असेल.

२. अर्धवेळ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पूर्णवेळ कर्मचाऱ्यांसाठी देय असलेल्या वेतन मॅट्रिक्समधील रकमेच्या निम्मी इतकी वित्तलब्धी मंजूर करावयाचे तत्व स्विकारण्यात आले आहे. त्यासाठी दिनांक १ जानेवारी २०१६ रोजी त्यांची सुधारित वेतनश्रेणी निश्चित करताना त्यांच्या असुधारित एकत्रित वेतनातील मूळ वेतनाच्या रक्कमेस २.५७ या संख्येने गुणावे. वरीलप्रमाणे गुणून पूर्णांकित केलेली रक्कम संबंधित अर्धवेळ कर्मचाऱ्यांसाठी विहित सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये अनुज्ञेय वेतन स्तरामधील सेलमध्ये (Cell) असल्यास ती रक्कम सुधारित वेतन ठरेल.

जर ती रक्कम अनुज्ञेय वेतन स्तरामधील सेलमध्ये नसेल तर सदर पूर्णांकित रक्कमेच्या लगतच्या पुढील सेलमधील येणाऱ्या रक्कमेपेक्षा अनुज्ञेय सुधारित वेतन संरचनेच्या स्तरातील किमान वेतन अथवा पहिल्या सेलमधील रक्कम जास्त असेल तर त्या स्तरावरील किमान वेतनावर अथवा पहिल्या सेलमधील वेतनावर वेतन निश्चित केले जाईल. (या रकमेस पुढील संदर्भासाठी "अ" असे संबोधले आहे. या रकमेवर प्रचलित दराने महागाई भत्ता मंजूर करण्यात यावा. वरील "अ" येथील रक्कम अगोदरच पूर्णवेळ कर्मचाऱ्यास मिळणाऱ्या रक्कमांच्या निम्मी करण्यात आलेली असल्यामुळे हा महागाई भत्ताही त्या पदावरील पूर्णवेळ कर्मचाऱ्यांस देय असणाऱ्या महागाई भत्त्याच्या निम्मा इतका असेल. (या रक्कमेस पुढील संदर्भासाठी "ब" असे संबोधले आहे.)

वर नमुद केलेले "अ" व "ब" या रक्कमांची बेरीज हे संबंधित अर्धवेळ कर्मचाऱ्यांचे एकत्रित सुधारित वतन असेल.

पूर्णवेळ कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर या सर्व कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन संरचनेत दिनांक १ जानेवारी अथवा दिनांक १ जुलै रोजी वेतनवाढ देय होईल. ही वेतनवाढ त्या अर्धवेळ कर्मचाऱ्यास प्रत्यक्ष मिळणाऱ्या वेतनाच्या तीन टक्के दराने अनुज्ञेय ठरेल. (वरील "अ" आणि "ब" येथील रकमा अगोदरच पूर्णवेळ कर्मचाऱ्यास मिळणाऱ्या रकमांच्या निम्मे करण्यात आले असल्याने ही वेतनवाढही त्या पदावरील पूर्णवेळ कर्मचाऱ्यास देय असणाऱ्या वेतनवाढीच्या निम्मे इतकी होईल) वेतनवाढ परिगणित करताना त्यात महागाई भत्त्याच्या भागाचा समावेश असणार नाही.

तसेच वेगवेगळे असुधारित वेतन घेणाऱ्या अर्धवेळ कर्मचाऱ्यांचे सुधारित वेतन मॅट्रीक्समधील वेतन एकाच रकमेवर निश्चित होण्याची शक्यता (Bunching Of Pay) नाकारता येत नाही. अशा प्रकरणी महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ मधील नियम (७) खालील तरतुदीनुसार त्यांना वेतनवाढीचा लाभ अनुज्ञेय राहील.

३. सुधारित वेतन संरचनेत विशेष वेतन मंजूर करण्यात येवू नये.

४. संबंधित कर्मचाऱ्यांना रोखीने अदा करावयाची थकबाकी ५ समान हप्त्यात मंजूर करावयाची आहे. याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील. सदर शासन आदेश रात्र शाळांतील शिक्षकांनाही लागू राहील. सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती करण्यासाठी आवश्यक तो विकल्प हे आदेश निर्गमित झाल्याच्या २ महिन्यांच्या आत देण्यात यावा. एकदा दिलेला विकल्प अंतिम राहील.

५. या आदेशान्वये लागू करण्यात आलेल्या सुधारित वेतन संरचनेमुळे होणारा अतिरिक्त खर्च शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे भत्ते ज्या लेखाशिर्षाखाली खर्ची घालण्यात येतो त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची घालण्यात यावा व त्या खालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सुधारित अंदाज तयार करताना सदर अतिरिक्त खर्च विचारात घ्यावा.

६. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२३५/२०१९/सेवा-९, दिं.१८.६.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०७१४४३०७१३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Charushila Devendra Chaudhari

Digitally signed by Charushila Devendra Chaudhari
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b99d7dca0e63be1bd1b7158b9523537dcc1d46bc807768647a9ed4ff3816ecf3, cn=Charushila Devendra Chaudhari
Date: 2019.08.07 14:51:03 +05'30'

(चारुशीला चौधरी)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.अध्यक्ष / उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव
२. मा.सभापती / उपसभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव
३. मा.मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे वि.का.अ., मंत्रालय, मुंबई
४. मा.विधानसभा / विधानपरिषद विरोधी पक्ष नेता
५. सर्व मा.विधानसभा व विधानपरिषद सदस्य
६. मा.अपर मुख्य सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई
७. महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई
८. महालेखापाल-१ (लेखा व अनज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
९. महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई
१०. महालेखापाल-२ (लेखा व अनज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
११. आयुक्त, शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे १
१२. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
१३. शिक्षण संचालक (प्राथमिक) , महाराष्ट्र राज्य, पुणे
१४. शिक्षण संचालक (अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे
१५. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
१६. संचालक, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
१७. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
१८. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ , पुणे
१९. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
२०. सहसंचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक नियोजन व प्रशिक्षण संस्था, औरंगाबाद
२१. प्रशासकीय अधिकारी, राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था (बालचित्रवाणी), पुणे
२२. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
२३. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२४. सर्व प्राचार्य, डाएट
२५. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक, माध्यमिक, निरंतर)
२६. सर्व शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई
२७. शालेय शिक्षण विभागातील सर्व कार्यासने
२८. निवड नस्ती, टिएनटी-३

शासन निर्णय क्र. वेतन १२१९/ प्र.क्र. १९/१९ टिएनटी ३ दि.०६/०८/२०१९ सोबतचे जोडपत्र									
	Pay Matrix								
ay Band IS : 2220-3720		Pay Band PB 1 : 2600-10100				Pay Band PB 2 : 4650-17400			
Grade Pay	650	*950*	*1000*	*1200*	*2400*	*2150*	*2300*	*2400*	*2450*
Level	**L-1**	**L-2**	**L-3**	**L-4**	**L-5**	**L-6**	**L-7**	**L8**	**L-9**
1	7500	9950	10850	12750	14600	19300	22450	23800	24550
2	7700	10200	11200	13100	15000	19900	23100	24500	25300
3	7900	10500	11500	13500	15500	20500	23800	25200	26100
4	8100	10800	11800	13900	16000	21100	24500	26000	26900
5	8300	11100	12200	14300	16500	21700	25200	26800	27700
6	8500	11400	12600	14700	17000	22400	26000	27600	28500
7	8800	11700	13000	15100	17500	23100	26800	28400	29400
8	9100	12100	13400	15600	18000	23800	27600	29300	30300
9	9400	12500	13800	16100	18500	24500	28400	30200	31200
10	9700	12900	14200	16600	19100	25200	29300	31100	32100
11	10000	13300	14600	17100	19700	26000	30200	32000	33100
12	10300	13700	15000	17600	20300	26800	31100	33000	34100
13	10600	14100	15500	18100	20900	27600	32000	34000	35100
14	10900	14500	16000	18600	21500	28400	33000	35000	36200
15	11200	14900	16500	19200	22100	29300	34000	36100	37300
16	11500	15300	17000	19800	22800	30200	35000	37200	38400
17	11800	15800	17500	20400	23500	31100	36100	38300	39600
18	12200	16300	18000	21000	24200	32000	37200	39400	40800
19	12600	16800	18500	21600	24900	33000	38300	40600	42000
20	13000	17300	19100	22200	25600	34000	39400	41800	43300
21	13400	17800	19700	22900	26400	35000	40600	43100	44600
22	13800	18300	20300	23600	27200	36100	41800	44400	45900
23	14200	18800	20900	24300	28000	37200	43100	45700	47300
24	14600	19400	21500	25000	28800	38300	44400	47100	48700
25	15000	20000	22100	25800	29700	39400	45700	48500	50200
26	15500	20600	22800	26600	30600	40600	47100	50000	51700
27	16000	21200	23500	27400	31500	41800	48500	51500	53300
28	16500	21800	24200	28200	32400	43100	50000	53000	54900
29	17000	22500	24900	29000	33400	44400	51500	54600	56500
30	17500	23200	25600	29900	34400	45700	53000	56200	58200
31	18000	23900	26400	30800	35400	47100	54600	57900	59900
32	18500	24600	27200	31700	36500	48500	56200	59600	61700
33	19100	25300	28000	32700	37600	50000	57900	61400	63600
34	19700	26100	28800	33700	38700	51500	59600	63200	65500
35	20300	26900	29700	34700	39900	53000	61400	65100	67500
36	20900	27700	30600	35700	41100	54600	63200	67100	69500
37	21500	28500	31500	36800	42300	56200	65100	69100	71600
38	22100	29400	32400	37900	43600	57900	67100	71200	73700
39	22800	30300	33400	39000	44900	59600	69100	73300	75900
40	23500	31200	34400	40200	46200	61400	71200	75500	78200